# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

**Savitribai Phule Pune University**

**Ganeshkhind, Pune - 411007**

दूरध्वनी क्रमांक : 020-25621205
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


परिपत्रक क्र. ६५/२०२६

## "विद्यापीठ विभागामधील विद्यार्थ्यांकरीता"

विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागातून शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करणेबाबत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ पूर्वी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्यांचे स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** शैक्षणिक प्रवेश विभागामार्फत विद्यार्थ्यांना अर्ज केल्यानुसार दिले जाते. ही सर्व प्रक्रिया करत असताना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष येऊन अर्ज भरून द्यावा लागतो, त्यानंतर बॅकेत जाऊन चलन भरावे लागते तसेच ग्रंथालय विभाग, वसतिगृह कार्यालय व संबंधित शैक्षणिक विभाग यांचेकडून ना–देय प्रमाणपत्र **(No Dues Certificate)** सही व शिक्का घेऊन शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये अर्ज जमा केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही केली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या वेळेचा अपव्यव होतो.

सबब, ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विहीत केली असून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागातून शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ पूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत व अद्यापपर्यंत स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** घेतलेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी आवश्यकता असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** मिळण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून सोबत जोडलेल्या कार्यपध्दती **(User Manual)** नुसार कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ:शै.प्रवेश /११८१ )
दिनांक : १६/०५/२०२६ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. } आपणांस विनंती की, वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.